कोरोना/२०२०/सुचना/आदेश क्र. ३०३

महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग**

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२४/०३/२०२०

**वाचले**:-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५.
२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०.
४) साथ रोग अधिनियम १८९७.
५) कार्यकारी अभियंता, अलिबाग, सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांचेकडील पत्र जा.क्र.अवि/प्रशा/१८९४ दि.२४/०३/२०२०.

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत जगभरात पसरलेल्या करोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे कलम १४४ लागू झाला असल्याने जमावबंदी तसेच संचारबंदी करण्यात आली आहे. त्यामूळे रायगड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते तसेच पंतप्रधान सडक योजने अंतर्गत रस्ते, इलेक्ट्रीक पोल टाकणे, BSNL लाईन मेंटनन्स, पाणी पुरवठा, इलेक्ट्रीक मेंटनन्स इत्यादी व अनुषंगीक कामे सद्य:स्थितीतील आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता तात्काळ पूर्ण होणे गरजेचे आहे. सबब ती कामे तात्काळ पूर्ण करुन घेण्यात यावीत, जेणेकरुन अत्यावश्यक सेवा कोलमडणार नाही.

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

सही/-xxx
( निधी चौधरी )
**जिल्हाधिकारी रायगड**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**
१) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल (NHAI).
२) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, पेण.
३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग, महाड, पनवेल.
४) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, रा.जि.प.अलिबाग.
५) कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामीण सडक योजना, रायगड.
६) कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, रा.जि.प.अलिबाग
७) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.म.कंपनी, पेण.
८) वरीष्ठ महाप्रबंधक, बी.एस.एन.एल.,पनवेल

( निधी चौधरी )
**जिल्हाधिकारी रायगड**